## किरकोळ अर्ज क्र. ११६/२०२६ मधील
## निशाणी १ वरील *आदेश*

(पारीत दिनांक ३०.०७.२०२६)

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायदाचे भाग २ प्रमाणे मयताचे वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केला आहे.

०२) अर्जदाराच्या कथनानुसार, मयत **मोहम्मद आफ्फान मोहम्मद इद्रीस भुत** हे ता. नांदगाव खंडेश्वर, अमरावती येथील रहिवाशी होते. मयत **मोहम्मद आफ्फान मोहम्मद इद्रीस भुत** यांचा दिनांक १७.१२.२०२५ रोजी मुंडनिशांकराव, ता. नांदगाव खंडेश्वर, अमरावती येथे मृत्यु झाला आहे. मयत **मोहम्मद आफ्फान मोहम्मद इद्रीस भुत** यांचे अर्जदार क्र. १ वडील आणि अर्जदार क्र.२ आई आहे. मयत **मोहम्मद आफ्फान मोहम्मद इद्रीस भुत** यांना अर्जदार क्र. १ आणि २ शिवाय दुसरे कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार यांना शासकीय तथा निमशासकीय कामाकरिता अर्जदाराने अर्ज दाखल केलेला आहे.

०३) अर्जदाराच्या अर्जाच्या अनुषंगाने कोणाचा आक्षेप असल्यासंदर्भात *''दैनिक जनमाध्यम '* नि.क्र.१३ अन्वये वर्तमानपत्रात प्रगटन देण्यात आले.

०४) अर्जदाराने त्याच्या कथनाच्या पृष्थार्थ एकुण दोन साक्षीदार तपासले.

| | | |
|---|---|---|
| सा.क्र.१ | **मो. इद्रीस अब्दुल गफार भुत (अर्जदार क्र.०१)** | नि.क्र. ०९ |
| सा.क्र.२ | **नवल देवकिसन खीची** | नि.क्र. १४ |

अर्जदाराने त्याचा मौखीक साक्ष पुरावा पुरशिस नि.क्र.१५ प्रमाणे बंद केला.

०५) अर्जदाराने खालील कागदपत्रांचा आधार घेतला.

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदारांचा अधिकृत पत्ता | नि.क्र. ०३ |
| २ | **मोहम्मद आफ्फान मोहम्मद इद्रीस भुत** यांचे मृत्यू प्रमाणपत्र | नि.क्र.१० |
| ३ | अर्जदाराचे आधारकार्डची प्रमाणित प्रत | नि.क्र.११ आणि १२ |
| ४ | दैनिक जनमाध्यम, दि. २३.०४.२०२६ | नि.क्र. १३ |

०६) अर्जदाराचा सा.क्र. १ व २ चे पुराव्यावरून व मृत्यू दाखल्यावरून **मोहम्मद आफ्फान मोहम्मद इद्रीस भुत** हे दिनांक १७.१२.२०२५ रोजी मयत झाल्याचे त्यांच्या साक्ष पुराव्यावरुन

आढळुन येते. तसेच त्यांच्या साक्ष पुराव्यावरुन अर्जदार हा मयताचा वारस आहे असे स्पष्ट होते. तसेच त्यांच्या साक्ष पुराव्यावरुन असे आढळून येते की, अर्जदार क्र. १ वडील आणि अर्जदार क्र.२ आई आहे. त्यामुळे अर्जदार हे मयताचे वारस आहे. तसेच त्यांच्या साक्ष पुराव्यावरुन मयतास अर्जदार यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस असल्याचे आढळून येत नाही.

**०७)** महत्वाचे म्हणजे प्रस्तुत प्रकरणात *''दैनिक जनमाध्यम'* नि.क्र.१३ वर्तमानपत्रात दिनांक २३.०४.२०२६ रोजी जाहीर नोटीस संबंधीत दैनीक पत्रात देण्यात आली आहे. परंतु त्यानंतरही विहीत मुदतीत कोणीही अर्जदाराच्या अर्जाला आक्षेप घेतलेला नाही. त्यामुळे अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे.

**०८)** एकंदरीत अर्जदाराने दाखल केलेले सा.क्र. १ व २ चे पुरावे, कागदपत्रे व शपथपत्र पाहता अर्जदार हे मयत **मोहम्मद आफ्फान मोहम्मद इद्रीस भुत** यांचे वारस आहे, असे दिसून येते. त्यामुळे ते बॉम्बे रेग्युलेशन कायदा भाग २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## **– आ दे श –**

१ अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२ बॉम्बे रेग्युलेशन कायद्याचे तरतुदीप्रमाणे अर्जदार याचे नावे मयत **मोहम्मद आफ्फान मोहम्मद इद्रीस भुत** यांचे वारस प्रमाणपत्र द्यावे.

३ अर्जदाराने कायद्यानुसार आवश्यक न्यायालयीन मुद्रांक शुल्क अदा करावे.

अर्जदाराने दिवाणी नियमावलीचे परिच्छेद ३१२ प्रमाणे पुर्तता करावी व संबंधित परिच्छेद ३१२ प्रमाणपत्रा सोबत जोडावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by AMBHORE SHANKAR BABURAO
Date: 2026.07.30 14:59:29 +0530

(एस. बी. अंभोरे)

दिनांक : ३०.०७.२०२६ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर

## Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. S. Dongare |
| Court Name | : | Court of C.J.J.D.,Nandgaon Kh. |
| Date | : | 30/07/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 30/07/2026 |
| Order uploaded on | : | 30/07/2026 |

XXXX